तरुण भारत

# साखरप्यातून वाहतेय जगभर `बुकगंगा'!

Posted: 1:02 AM, 22/01/2014 by Parashuram Patil

रत्नागिरी / प्रतिनिधी

मराठी साहित्य जगभर पोहोचविण्याचा विडा एका युवकाने 3 वर्षांपूर्वी उचलला आणि आज जगभर मराठी साहित्य इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध झाले आहे. 450 प्रकाशक, त्यांची 1 लाखांहून अधिक पुस्तके, तसेच 2000 मोफत पुस्तके वाचण्याची सुविधा इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध करणाऱया या युवकाचे नाव आहे...`मंदार जोगळेकर'!... तर त्यांच्या या वेबसाईटचे नाव आहे `बुकगंगा'. विशेष सांगायचे म्हणजे हा युवक आहे रत्नागिरी जिह्याच्या संगमेश्वर तालुक्यातील साखरपा येथील आहे. पुण्यातील मुख्य शाखेबरोबर साखरपा येथेही `बुकगंगा'ची शाखा सुरू करून येथून ही `बुकगंगा' आता जगभर वहात आहे. रत्नागिरीतील `शोध मराठी मनाचा' संमेलनासाठी मंदार जोगळेकर रत्नागिरीत आले असता त्यांनी `तरूण भारत'शी संवाद साधला.

2009 साली पहिले विश्व साहित्य संमेलन कॅलिफोर्नियात झाले. या संमेलनात मराठी पुस्तकं सहजी जगात कशी उपलब्ध होतील? असा प्रश्न उपस्थित झाला आणि यातूनच प्रेरणा घेऊन मंदार यांनी पावले उचलली. तीन वर्षांपूर्वी `बुकगंगा'च्या रूपात याला मूर्त स्वरूप आले आणि आज `बुकगंगा'च्या माध्यमातून ते जगभर फिरत असतात. मराठी पुस्तके वाचकांना जगभरात उपलब्ध होणे हे माझे `पॅशन आणि मिशन' असल्याचे त्यांनी सांगितले. आज `बुकगंगा'द्वारे 11 हजार पुस्तकं ई-बुक स्वरूपात उपलब्ध आहेत. आयपॅड आणि टॅबलेटच्या माध्यमातून `बुकगंगा'चे ऍप तयार करण्यात आले. याद्वारे तुम्ही कुठेही बसून वाचनाचा आनंद घेऊ शकता.

आज चित्रपटक्षेत्रात पायरसी वाढली आहे. त्यामुळे हे माध्यम तयार करताना प्रकाशकांची, तसेच लेखकांच्या पुस्तकांच्या पुस्तकांची पायरसी होणार नाही. याबद्दलची सुरक्षितता प्रकर्षाने काटेकोरपणे घेण्यात आली. याद्वारे पुस्तकांबरोबर ऑडिओ आणि व्हिडीओ म्हणजे दृकश्राव्य स्वरूपाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अशाप्रकारचे हे माध्यम भारतात प्रथम मंदार जोगळेकर यांनी उपलब्ध करून दिले आहे. तसेच वेबसाईटचे हे तंत्रज्ञान ते आता प्रकाशकांना उपलब्ध करून देत आहेत. ज्याद्वारे नवी पुस्तकं जगभर आणता येतील.

www.BookGanga.com या `बुकगंगा'च्या वेबसाईटवर मराठी वाचक विविध मराठी पुस्तकांची माहिती मिळवू शकतात. तसेच काय वाचावं? याचं मार्गदर्शन, स्पर्धा परिक्षांची पुस्तकं, करियर गायडन्सची पुस्तकं आदींची माहिती मिळवू शकतात. यावर लेखकाच्या नावाने, विषयानुसार, साहित्य प्रकाराप्रमाणेही पुस्तके शोधण्याची सुविधा आहे. तसेच `बुकगंगा'ने पुस्तके घरी पाठविण्याची सुविधाही वाचकांना उपलब्ध केली आहे. पुस्तकांवरील छापील किंमतीतच ही पुस्तकं `बुकगंगा'द्वारे संपूर्ण भारतात घरपोच मिळू शकतात. ई-बुकमुळे व्यवहारात पारदर्शकता आणि तत्परता आल्याचे मंदार यांनी सांगितले.

### `बुकगंगा'चे पुण्यात मुख्य कार्यालय

`बुकगंगा'चे पुण्यात सिंहगड रोडवर पानमळा येथे मुख्य कार्यालय आहे. या कार्यालयात 60 कर्मचारी कार्यरत आहेत. 3 वर्षांपूर्वी 7 कर्मचाऱयांपासून सुरू झालेल्या या कामाचा आवाका आता इतका व्यापक झाला आहे. मंदार यांनी हा आवाका पाहून यासाठी साखरपा येथे आपल्या गावीही याची एक शाखा काढली. यामध्ये 15 तरूण-तरूणी कार्यरत आहेत.

### अमेरिकन न्युजपेपर असोसिएशनतर्फे निमंत्रण

मंदार यांनी केलेल्या या कार्याची दखल अमेरिकन न्युजपेपर असोसिएशनतर्फे नुकतीच घेण्यात आली. मिडीयातील बदलते बदलते तंत्रज्ञान आणि ईपेपर या विषयावर प्रेझेंटेशन करण्यासाठी बोलविण्यासाठी खास बोलावले होते. आज मोबाईलमध्ये झालेली क्रांती आणि तरूणपिढीचा मोबाईलबाबत असलेले आकर्षण लक्षात घेता लवकरच मोबाईलच्या माध्यमातून `बुकगंगा' पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. याचबरोबर पुण्यामध्ये वेअरहाऊस उभारले जात असल्याचीही माहिती मंदार यांनी दिली.